समता शिक्षण संस्था, पुणे-३०

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे (नकाणे) ता. जि. धुळे.**

---

## भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती कार्यक्रम
## Library orientation उद्बोधन कार्यक्रम, ग्रंथप्रदर्शन
## *अहवाल (२०१५-१६)*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि.धुळे येथील महाविद्यालयात भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांची १२३ वी जयंती निमित्ताने ग्रंथालयातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर रंगनाथन जयंती निमित्ताने Library orientation उद्बोधन कार्यक्रमे, ग्रंथालयातील ग्रंथाचे ग्रंथप्रदर्शनाचे देखिल आयोजन ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी केले.

सदरील कार्यक्रमाचे उद्घाटक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे व कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव यांच्या हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून सेवानिवृत्त ग्रंथपाल पी.एफ.पाटील होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पुजन कार्यक्रमाचे उद्घाटक, प्रमुख पाहुणे, अध्यक्ष, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख उद्घाटक, प्रमुख पाहुणे आणि अध्यक्ष यांच्ये स्वागत स्वागत-गीताने करण्यात आले. त्यांचा परिचय विद्यार्थ्यांना करुन देण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर यांनी उद्घाटनपर आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतातून त्यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल वापराबाबतचे योग्य मार्गदर्शन केले. मोबाईल वापरण्याचे फायदे आणि दुष्परिणाम तसेच जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, दिल्ली येथील विद्यार्थ्यांचे मोबाईल वापराचे प्रमाण ९०% आहे. म्हणजेच दिल्ली विद्यापीठातील Tablet वापरण्याचे प्रमाण १०% आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रातील विद्यापीठ /महाविद्यालयातील विद्यार्थी हे मोबाईल वापरत आहेत. मोबाईल व संगणकाच्या माध्यमातुन Internet वापरण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. त्यामुळे सायबर गुन्हेगारी देखिल वाढत आहे. मोबाईलचा वापर महत्वाच्या कामाकरिता आवश्यक आहे. चांगल्या गोष्टी व सवयी लावुन घेतल्या पाहिजेत असे विद्यार्थ्यांना उद्बोधन केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे प्रा.पी.एफ.पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची शिस्त, ग्रंथलयाचा वापर आणि डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या ग्रंथालयातील कार्याचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर मांडला. ग्रंथालयातील विविध पध्दतीचा वापराबाबत मार्गदर्शन केले. गंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची माहिती मार्गदर्शनातुन विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव यांनी विद्यार्थ्यांना आपल्या मार्गदर्शनात विद्यापीठ अनुदान आयोग अंतर्गत सहकार्याने INFLIBNET या संस्थेमार्फत शैक्षणिक करार (The Ministry of Human Resource Development ) भारत सरकारने AICTE च्या सहाय्याने इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील ज्ञान संग्रह प्राध्यापक व विद्यार्थ्यी यांच्यासाठी तयार करण्यात आला आहे. N-List च्यामाध्यमातुन E_Book, E_Journal यांचा वापर करता यावा म्हणून आपले महाविद्यालय २०१४-१५ पासून सभासद आहे. N-List काय आहे? तर

National Library and Information Services Infrastructure for Scholarly Content म्हणजेच वाचकांकरिता ज्ञानसंग्रह. त्याचा वापर कसा करावा? याबाबत मार्गदर्शन केले. E_Book, N-List च्या Website वर एकूण ८३,००० पुस्तके उपलब्ध आहेत. ती आपणांस डाऊनलोड करुन घेता येतात. E_Journals ३८०० उपलब्ध आहेत. तुम्ही इंटरनेटच्या माध्यमातुन वापर करु शकतात. ग्रंथालय सहभागी या उपक्रमामुळे विविध ग्रंथालयातील ग्रंथाचा वापर करण्यासाठी सोपे झालेले आहे. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त N-List या Website चा वापर करावा. असे महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव यांनी मार्गदर्शनातुन आपले मत व्यक्त केले. त्याचबरोबर ग्रंथ निर्मितीचा इतिहास, ग्रंथाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, ग्रंथाचे महत्व ज्ञान व्यवस्थापन करणे. ही एक काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे माहिती तंत्रज्ञानाची ज्या पध्दतीने वाढ होते आहे. त्याच गतीने माहितीची निर्मिती होत आहे. या माहितीचे व्यवस्थापन देखिल ग्रंथालयात केले जाते.

सदरील कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व वर्गातील विद्यार्थ्यी उपस्थित होते. सदरील कार्यक्रमात विद्यार्थी परिषदेवर निवडुन आलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे, प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हर्षदा सोनवणे यांनी केले तर सर्व उपस्थित प्रमुख पाहुणे, उद्घाटक, अध्यक्ष आणि प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचे पुरुषोत्तम केदार या विद्यार्थ्याने ग्रंथालयामार्फत आभार मांडले. कार्यक्रम संपल्यानंतर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथालयाचे कर्मचारी श्री. मनोज ठाकरे, श्रीमती. आम्रपाली सुर्यवंशी, श्री.सुभाष बागुल, श्री.विजय आगळे, श्री.सुधिर पाटील, श्री. विशाल भदाणे यांचे सहकार्य लाभले.

सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी सदरील कार्यक्रमाच्या सुरुवातीला जयहिंद महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. माणिकराव वळवी यांचे अपघाती निधन झाल्यामुळे त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

| | |
|---|---|
| **ग्रंथपाल** | **प्राचार्य** |
| **(प्रा.गजेंद्र जगदेव)** | **( डॉ. जालिंदर अडसुळे )** |

कार्यक्रमाचे उद्घाटक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे व कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून सेवानिवृत्त ग्रंथपाल पी.एफ.पाटील




**प्रा.पी.एफ.पाटील सर विद्यार्थ्यांनामार्गदर्शन करतांना**



महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना



**कार्यक्रमास उपस्थित महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यी**



ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन करतांना प्रा.पी.एफ.पाटील सर ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळेसर





ग्रंथप्रदर्शनात सहभागी विद्यार्थी



समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि.धुळे**

===================================================================

## भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांची १२५ वी जयंती कार्यक्रम / ग्रंथप्रदर्शन उद्‌बोधन कार्यक्रम

## अहवाल २०१६-१७

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि.धुळे येथील महाविद्यालयात भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांची १२५ वी जयंती निमित्ताने ग्रंथालयातर्फे दिनांक १३ ऑगस्ट २०१६ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर रंगनाथन जयंती निमित्ताने Library orientation programme उद्‌बोधन कार्यक्रम, ग्रंथालयातील ग्रंथाचे ग्रंथप्रदर्शनाचे देखिल आयोजन ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी केले होते.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सुवर्णा बरडे यांच्या हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून SVKM's NMIMS शिरपूर येथील **ग्रंथपाल प्रा.रविंद्र मेढे** उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पुजन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, अध्यक्ष, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे आणि अध्यक्ष यांच्ये स्वागत स्वागत-गीताने करण्यात आले. त्यांचा परिचय विद्यार्थ्यांना करुन देण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयाचे **ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव** यांनी प्रास्ताविक मांडले. आपल्या प्रास्ताविकातुन त्यांनी विद्यार्थ्यांना पद्‌मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली. तसेच त्यांचा जन्मदिवस हा ग्रंथपाल दिवस म्हणुन साजरा केला जातो. त्यानंतर प्रमुख पाहुणे प्रा. रविंद्र मेंढे यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची शिस्त, ग्रंथलयाचा वापर आणि ग्रंथालयातील विविध पध्दतीचा वापराबाबत मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी Google Services, Digital Libraries, Discovery Services, E-Book Readers, तसेच Internet वर उपलब्ध असलेले Free National & International Journals जसे JSTORE, DOAJ,Springer Link, My Library MCG याबद्दल माहिती दिली. N-List काय आहे? तर National Library and Information Services

Infrastructure for Scholarly Content म्हणजेच वाचकांकरिता ज्ञानसंग्रह. त्याचा वापर कसा करावा? याबाबत मार्गदर्शन केले. N-List च्या Website वर सुमारे ९०,००० पेक्षा जास्त पुस्तके उपलब्ध आहेत. ती आपणांस डाऊनलोड करुन घेता येतात. तसेच E_Journals उपलब्ध आहेत याचा तुम्ही इंटरनेटच्या माध्यमातुन वापर करु शकतात.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सुवर्णा बरडे यांनी माहिती तंत्रज्ञानाची ज्या पध्दतीने वाढ होते आहे. त्याच गतीने माहितीची निर्मिती होत आहे. या माहितीचे व्यवस्थापन देखिल ग्रंथालयात करणे ही एक काळाची गरज आहे. तसेच विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त ICT चा वापर करावा, अशी माहिती मार्गदर्शनातुन विद्यार्थ्यांना दिली.

सदरील कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व वर्गातील विद्यार्थ्यी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन MSW - I वर्गातील विद्यार्थी विकास पाटील यांनी केले तर सर्व उपस्थित प्रमुख पाहुणे, उद्‌घाटक, अध्यक्ष आणि प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचे

MSW - I वर्गातील विद्यार्थीनी कु. अश्विनी सावंत यांनी ग्रंथालयामार्फत आभार मांडले. कार्यक्रम संपल्यानंतर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव तसेच ग्रंथालयाचे कर्मचारी श्री.सुभाष बागुल, श्री.विजय आगळे, श्री. विशाल भदाणे, श्री. मनोज ठाकरे, श्रीमती. आम्रपाली सुर्यवंशी, श्री.सुधिर पाटील यांचे सहकार्य लाभले.

**ग्रंथपाल** **प्राचार्य**



समता शिक्षण संस्था, पुणे संचलित

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि.धुळे**

==================================================================

## भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन जयंती व ग्रंथ प्रदर्शन कार्यक्रम

### अहवाल २०१७-१८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि.धुळे येथे ग्रंथालयातर्फे दि. १२/०८/२०१७ रोजी "**डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती"** व "**ग्रंथपाल दिन"** या कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रंथालयातर्फे दि. १९/०८/२०१७ रोजी विद्यार्थ्यांकरिता Library Orientation Programme व ग्रंथप्रदर्शन या कार्यक्रमांचे आयोजन ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी केले होते.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे** सर तसेच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून विद्यावर्धीनी महाविद्यालय, धुळे  येथील **ग्रंथपाल प्रा.योगेश पाटील** उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पुजन, कार्यक्रमाचे  प्रमुख पाहुणे, अध्यक्ष, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी  आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे आणि अध्यक्ष यांचे स्वागत स्वागत-गीताने करण्यात आले. त्यांचा परिचय विद्यार्थ्यांना करुन देण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयाचे **ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव** यांनी प्रास्ताविक मांडले. आपल्या प्रास्ताविकातुन त्यांनी विद्यार्थ्यांना पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली. तसेच त्यांचा जन्मदिवस हा ग्रंथपाल दिवस म्हणुन साजरा केला जातो. तसेच प्रास्ताविक मांडत असतांना त्यांनी INFLIBNET N-List बद्दल माहिती दिली. त्यानंतर प्रमुख पाहुणे प्रा.योगेश पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना E-Resources बद्दल माहिती देतांना  नव-नविन संकेतस्थळांची माहिती करुन दिली. उमवि अंतर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या प्रश्नपत्रिका तसेच अभ्यासक्रम कसा शोधावा? हे समाजावुन सांगितले. तसेच त्यांनी National Digital Library of India याबद्दल माहिती दिली व सांगितले की, याचा वापर हा आपण विनाशुल्क करु शकतो फक्त आपल्याला त्यात E_mail ने नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच कृषीविषयक माहिती हवी असेल तर आपण

www.krishikosh.egranth.ac.in/ या संकेतस्थळाचा वापर करु शकतो. Free E-Book हवे असतील तर आपण www.rasik.com/ या संकेतस्थळाचा वापर करु शकतो. तसेच मराठी भाषेतील एखाद्या शब्दाचा अर्थ हवा असेल तर आपण https://www.vishwakosh.org.in/ या संकेतस्थळाचा वापर करु शकतो. तसेच http://www.rarebookroom.org/ या संकेतस्थळाचा वापर आपण जुन्या पुस्तकांच्या प्रती वाचण्यासाठी करु शकतो. तसेच विद्यार्थ्यांना http://yojana.gov.in/, https://www.wikipedia.org/ http://www.employmentnews.gov.in/, http://www.onlinenewspapers.com/ इ. उपयुक्त संकेतस्थळांची माहिती दिली. तसेच N-List च्या Website वर सुमारे ९०,००० पेक्षा जास्त पुस्तके उपलब्ध आहेत. ती आपणांस डाऊनलोड करुन घेता येतात. तसेच E_Journals उपलब्ध आहेत याचा तुम्ही इंटरनेटच्या माध्यमातुन वापर करु शकतात.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे यांनीही E_Journals, E_Resources तसेच इंटरनेट याबद्दल माहिती देत असतांना ते म्हणाले की ही सर्व माहिती मिळविण्यासाठी आपल्याला संगणकाची बेसिक माहिती असणे आवश्यक आहे तसेच महत्वाचे म्हणजे सर्व विद्यार्थ्यांचे स्वत:चे E_mail Account असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त ICT चा वापर करावाच पण ग्रंथालयातील पुस्तकांचाही वापर करुन आपले ज्ञान अधिक अधिक वाढवावे अशी माहिती मार्गदर्शनातुन विद्यार्थ्यांना दिली.

सदरील कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व वर्गातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन BSW - II वर्गातील विद्यार्थी साजिद शेख यांनी केले तर सर्व उपस्थित प्रमुख पाहुणे, उद्‌घाटक, अध्यक्ष आणि प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचे BSW - II वर्गातील विद्यार्थी कल्पेश भामरे यांनी ग्रंथालयामार्फत आभार मांडले. कार्यक्रम संपल्यानंतर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथपाल प्रा. गजेंद्र जगदेव तसेच ग्रंथालयाचे कर्मचारी श्री.सुभाष बागुल, श्री.विजय आगळे, श्री. विशाल भदाणे, श्री. मनोज ठाकरे, श्रीमती. आम्रपाली सुर्यवंशी, श्री.सुधिर पाटील यांचे सहकार्य लाभले.

| | |
|---|---|
| **ग्रंथपाल** | **प्राचार्य** |
| **गजेंद्र जगदेव** | **डॉ. जालिंदर अडसुळे** |

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पुजन, करतांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, प्रा. योगेश पाटील सर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जालिंदर अडसुळे सर



प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून विद्यावर्धीनी महाविद्यालय, धुळे येथील **ग्रंथपाल प्रा.योगेश पाटील यांचे स्वागत करतांना** महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे** सर



**महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे** सर यांचे स्वागत करतांना **ग्रंथपाल प्रा.गाजेंद्र जगदेव**




महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना



**Books Exhibition 2017-18**








STUDENT WELFARE UNIT
STAFF ROOM
वीर बिरसा मुंडा

*कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट विद्यापीठ जळगांव संलग्नीत*
*समता शिक्षण संस्था पुणे-३०*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि.धुळे.*

---

# डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती व ग्रंथप्रदर्शन

अहवाल-२०१८-१९

समता शिक्षण संस्था पुणे-३०डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि. धुळे येथील महाविद्यालयात भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती कार्यक्रम व त्यानिमित्ताने ग्रंथालयातर्फे ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पुजन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर, व महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव यांच्या हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव उपस्थित होते. त्यानंतर प्रमुख पाहुणे प्रा.गजेंद्र जगदेव यांनी आपल्या मार्गदर्शनातून शिक्षकांना डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या ग्रंथालयातील कार्याचा जीवनपट सांगितला. ग्रंथालयातील विविध पध्दतीचा वापराबाबत मार्गदर्शन केले.एन लिस्ट च्यामाध्यमातुन .ई-बुक्स,जर्नल्स यांचा वापर करता यावा म्हणून आपले महाविद्यालय सभासद आहे. शोधगंगा, शोधसिंधू, जे स्टोर ,जे गेट इत्यादी माध्यमातुन वेबसाइट वर एकूण १५,०००पेक्षा जास्त नियतकालिके,उपलब्ध आहेत. ती आपणांस डाऊनलोड करुन घेता येतात.ई-बुक्स दोन-तीन लाखाच्या वर उपलब्ध आहेत. तुम्ही इंटरनेटच्या माध्यमातुन वापर करु शकतात. गंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची माहिती मार्गदर्शनातुन दिली.

त्यानंतर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनातून शिक्षकानी ग्रंथालयाचा, ई-संसाधनाचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे.असे सांगितले.


सदरील कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सर्व उपस्थित ,प्रमुख पाहुणे, उद्‌घाटक, अध्यक्ष आणि प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेही आभार ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव मांडले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथालयाचे कर्मचारी श्री. मनोज ठाकरे, श्रीमती. आम्रपाली सुर्यवंशी, श्री.सुभाष बागुल, श्री.विजय आगळे, श्री. विशाल भदाणे यांचे सहकार्य लाभले.


| | |
|---|---|
| **ग्रंथपाल** | **प्राचार्य** |
| **गजेंद्र जगदेव** | **डॉ. जालिंदर अडसुळे** |

## Library Orientation Program

प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव विद्यार्थ्यांना **मार्गदर्शन करतांना**



## N-List Program



**ग्रंथ प्रदर्शन**



समता शिक्षण संस्था पुणे-३०

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि.धुळे.

---

दिनांक-१३/०८/२०१९

# अहवाल-२०१९-२०

## डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती व ग्रंथप्रदर्शन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे, ता.जि. धुळे येथील महाविद्यालयात भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांची १२८ वी जयंती कार्यक्रम व त्यानिमित्ताने ग्रंथालयातर्फे ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पुजन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर, प्रा.डॉ. रघुनाथ महाजन,व महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव यांच्या हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव उपस्थित होते.

त्यानंतर प्रमुख पाहुणे प्रा.गजेंद्र जगदेव यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची शिस्त, ग्रंथलयाचा वापर आणि डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या ग्रंथालयातील कार्याचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर मांडला. ग्रंथालयातील विविध पध्दतीचा वापराबाबत मार्गदर्शन केले.एन लिस्ट च्यामाध्यमातुन .ई-बुक्स,जर्नल्स यांचा वापर करता यावा म्हणून आपले महाविद्यालय सभासद आहे. शोधगंगा, शोधसिंधू, जे स्टोर ,जे गेट इत्यादी माध्यमातुन वेबसाइट वर एकूण १०,००० नियतकालिके,उपलब्ध आहेत. ती आपणांस डाऊनलोड करुन घेता येतात.ई-बुक्स दोन लाखाच्या वर उपलब्ध आहेत. तुम्ही इंटरनेटच्या माध्यमातुन वापर करु शकतात. गंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची माहिती मार्गदर्शनातुन विद्यार्थ्यांना दिली.

त्यानंतर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा, ई-संसाधनाचा अभ्यासासाठी जास्तीत जास्त वापर विद्यार्थ्यांनी केला पाहिजे.असे सांगितले.

सदरील कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व वर्गातील विद्यार्थ्यी उपस्थित होते. तसेच ग्रंथालय सल्लागार समितीचे सदस्य प्रा.डॉ.सुदाम राठोड ,प्रा.डॉ.सुवर्णा बरडे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुभाष बागुल यांनी केले आणि सर्व उपस्थित ,प्रमुख पाहुणे, उद्‌घाटक, अध्यक्ष आणि प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचेही आभार मांडले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथालयाचे कर्मचारी श्री. मनोज ठाकरे, श्रीमती. आम्रपाली सुर्यवंशी, श्री.सुभाष बागुल, श्री.विजय आगळे, श्री. विशाल भदाणे यांचे सहकार्य लाभले.

**ग्रंथपाल** | **प्राचार्य**

**गजेंद्र जगदेव** | **डॉ. जालिंदर अडसुळे**

**सोबत-कार्यक्रमाचे छायाचित्रे.**

**प्रतिमा पुजन करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जालिंदर अडसुळे सर, प्रा.डॉ. रघुनाथ महाजन, व महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.गजेंद्र जगदेव व इतर कर्मचारी**




डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या ग्रंथालयातील कार्याचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर मांडताना **महाविद्यालयाचे ग्रंथपाल.गजेंद्र जगदेव**



कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व वर्गातील उपस्थित विद्यार्थ्यी .



कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्व वर्गातील उपस्थित विद्यार्थ्यी यांचे आभार मानतांना श्री.सुभाष बागुल



ग्रंथालयातर्फे आयोजित ग्रंथप्रदर्शनाचा लाभ घेतांना सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी ,आणि सर्व वर्गातील उपस्थित विद्यार्थ्यी



समाप्त